# शाळांमध्ये गरजेचे सायबर कौन्सेलिंग

म. टा. प्रतिनिधी, हडपसर



**पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांचे आवाहन**

'विद्यार्थ्यांना इंटरनेटचे व्यसन लागल्यामुळे त्यांची पावले नकळतपणे सायबर गुन्ह्यांकडे वळत आहेत. विद्यार्थ्यांकडून होणारे गुन्हे वेळीच रोखण्यासाठी शाळा, कॉलेजांनी सायबर कौन्सेलिंग सेंटर सुरू करावेत. त्याद्वारे विद्यार्थ्यांना चांगल्या आणि वाईट परिणामांची माहिती मिळेल,' असे आवाहन पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी शनिवारी व्यक्त केले.

पुणे शहर पोलिसांच्या वतीने शिक्षक, विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती व्हावी यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी शुक्ला बोलत होत्या. पोलिस सहआयुक्त रवींद्र कदम, अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रदीप देशपांडे, पोलिस उपायुक्त सुधीर हिरेमठ, भारत फोर्ज कंपनीचे संचालक डॉ. एस. व्ही. भावे, सायबर क्राइम महाराष्ट्रचे अधीक्षक बलसिंग रजपूत, 'गूगल'चे रवी गुप्ता, डॉ. भूषण शुक्ला आदी उपस्थित होते.

शहरातील शैक्षणिक संस्थेचे शिक्षक मोठ्या संख्येने कार्यशाळेसाठी उपस्थित होते. या वेळी मुलांसाठी सायबर सिक्युरिटी पुस्तकाचे प्रकाशन शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले. 'प्रत्येक जण मोबाइलचा वापर करत आहे. यामध्ये तीन वर्षांची मुलेदेखील मोबाइलचा वापर करत आहेत. शालेय विद्यार्थीही ब्लू व्हेल गेमद्वारे संकटे ओढून घेत आहेत. सोशल माध्यमांवर हॅकरचीही नजर आहे. सायबर क्राइमच्या घटना वाढण्यापूर्वी तत्काळ पोलिसांना संपर्क करा,' असेही शुक्ला यांनी नमूद केले. शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये पंधरा लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यासाठी पाच हजार शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. शाळा, महाविद्यालयांनी देखील सायबर क्राइमबाबत माहिती देण्यासाठी सायबर कौन्सिलिंग सेंटर सुरू करावीत. त्याचा नक्कीच फायदा होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.